MHGA040001152020

**<u>न्यायालय विद्यमान दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), आरमोरी, जिल्हा — गडचिरोली.</u>**

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.५/२०२०</u>**

**<u>CNR-MHGA04-000115-2020</u>**

देवानंद नामदेव जांभुळकर
वय— ४५ वर्षे, धंदा — नोकरी,
राह. सुकाळा,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली.
ह.मु. पि.एन. मेश्राम यांचे घरी
रामनगर वार्ड, गडचिरोली .... **<u>वादी</u>**

— <u>वि रु द्ध</u> —

१. ईश्वर लहानु मडावी,
वय— ५५ वर्षे, धंदा —शेती,

२. नानाजी तुळशिराम कन्नाके,
वय— ६० वर्षे, धंदा —शेती.
दोन्ही राह. सुकाळा,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली. .... **<u>प्रतिवादी</u>**

.....................................................................................

## आदेश निशानी क्र.५ खाली

(पारीत आज दि.१०.२.२०२०)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी तात्पुरत्या मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे वकील यांनी एकतर्फा मनाई हुकूमासाठी युक्तीवाद केला.

३. वादींच्या वकीलांचे असे कथन आहे की, वादी हे नोकरी निमीत्य बाहेरगावी असतात तसेच त्यांचे कुटूंबीय देखील बाहेरगावी असतात. याचा फायदा घेवुन प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीवर त्यांच्या समाजामार्फत विरांगणा राणी दुर्गावती च्या मुर्तीची स्थापना करण्याच्या उद्‌देशाने अतिक्रमण करुन ओटयाचे बांधकाम केले आहे व त्यावर मुर्तीची स्थापना करणार आहे.

४. वादींनी नि.क्र.३ सोबत कागदपत्र दाखल केले आहे. अभिलेखावर भुमापन क्र.२ चा ७/१२ उतारा दिलेला आहे. त्यामध्ये भोगवटादार सदरी वादींचे नाव दिसत आहे. वादींनी नकाशा देखील दाखल केलेला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता भुमापन क्र.२ च्या तिन्ही बाजुंनी रस्ता असल्याचे दिसत आहे. तसेच एका बाजुला गट नं.१ आहे. वादपत्रातील चर्तुसिमेप्रमाणे गट नं.१ म्हणजेच उत्तरेस जगदीश वाढई यांची शेतजमीन आहे. वादींनी अभिलेखावर छायाचित्र दाखल केले आहे त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये तथाकथीत मुर्तीचा मुकूट दिसत आहे व मुर्ती पडदयाचे आड आहे. तसेच कच्च्या ओटयाचे बांधकाम दिसत आहे. वादींनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी वाद मिळकतीवर वादीचा सहभोगवटादार म्हणुन कब्जा दिसत आहे.

..२..

५.  वादीच्या कथनानुसार प्रतिवादी मुर्तीची स्थापना करण्याच्या बेतात आहे. तसे झाल्यास वादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होईल. वादीस प्रथमदर्शनी बाजु आहे. वरील कारणांचा विचार करता अशा परिस्थीतीत मनाई हुकूम देण्यास विलंब झाल्यास मनाई हुकूम देण्याचा उद्देश विफल होईल असे माझे मत आहे. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादींनी त्यांचे अगर इतरामार्फत वादमिळकतीवर मुर्तीचे स्थापनेकरीता दि.१७.२.२०२० पर्यंत कोणतेही बांधकाम करु नये तसेच वाद जागेवर अतिक्रमण करु नये.

२. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३ मधील बाबींची पुर्तता करावी.

३. प्रतिवादींना सदरहू तुर्तातूर्त आदेश पुढे कायम का करु नये ? यासाठी नोटीस काढावी.

४. वादींनी आदेशाची नोंद घ्यावी.

स्वा/-

**(आर. ए. सावंत)**
दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)
आरमोरी.

दिनांक : १०.२.२०२०